// उद्यमात् सकल समृद्धिः //

MIDC

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

क्र. मऔविम/ सह मु.का.अ. (विदर्भ) / P-499689/2025 दिनांक : 03/07/2025

# परिपत्रक

विषय :- महामंडळाच्या अखत्यारित असलेल्या राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र. ३ मधील माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्रातील Non Processing area करणेबाबत ...

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या हिंजवडी क्षेत्रामध्ये राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र. ३ मधील औद्योगिक क्षेत्र हे दि. ०७.०६.२००७ रोजीच्या Ministry of Commerce and Industry यांचे शासन निर्णयानुसार विशेष आर्थिक क्षेत्र म्हणुन घोषीत झालेले आहे. सदर क्षेत्रामधील क्षेत्र २२३.५६० हेक्टर हे विशेष आर्थिक क्षेत्र म्हणुन केंद्र सरकारने दि. ०५.१०.२००७ रोजी मान्यता देणेत आलेली आहे. सदर क्षेत्रात माहिती तंत्रज्ञान तसेच माहिती तंत्रज्ञान सहायभुत सुविधा मध्ये पायाभुत सुविधा जसे की, रस्ते, पाणीपुरवठा तसेच पथदिवे इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र. ३ विशेष आर्थिक क्षेत्रातील उद्योजकांकडुन भुखंडावरील बांधीव क्षेत्र Non Processing करणेकरिता विनंती अर्ज प्राप्त होत आहेत.

केंद्र सरकारचे Ministry of Commerce and Industry यांचे दि. ०६.१२.२०२३ रोजीच्या अधिसुचनेमधील अट क्र. ७ नुसार बांधीव क्षेत्र Non Processing करणेकरिता मध्ये रुपांतर करण्याची कमाल मर्यादा ही एकुण बांधकाम केलेल्या क्षेत्राच्या ५०टक्के पर्यंत व Ministry of Commerce and Industry यांच्या दि. ०९.०४.२०२४ च्या Instruction No. ११५ मधील Issue No. १६ नुसार SEZ Rule ११B अंतर्गत फक्त बांधकाम केलेल्या क्षेत्राकरिता (Non Processing) IT & ITes उद्योगासाठी /व्यवसायासाठी अनुज्ञेय राहील . याबाबातचा प्रस्ताव मा. संचालक मंडळाच्या दिनांक ०९.०५.२०२५ रोजीच्या ४०६ व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सदस्य मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन ठराव क्र. ६९२४ पारीत करण्यात आला असुन राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र. ३ विशेष आर्थिक क्षेत्रातील उद्योजकांकडुन भुखंडावरील बांधीव क्षेत्र Non Processing करणेकरिता विनंती अर्ज प्राप्त होत असल्याने Non processing साठी प्राप्त होणा-या प्रस्तावासाठी पुढीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

१) राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र. ३ विशेष आर्थिक क्षेत्रातील Co-developer status प्राप्त केलेल्या उद्योजकांना सदरचा लाभ अनुज्ञेय राहिल.

२) भूखंडधारकाने इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करणे बंधनकारक राहील.

३) वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय यांची दि. ०६.१२.२०२३ रोजीच्या अधिसुचनेमधील अट क्र.७ नुसार बांधीव क्षेत्र Non Processing मध्ये रुपांतर करण्याची कमाल मर्यादा ही एकूण बांधकाम केलेल्या क्षेत्राच्या ५० टक्के पर्यंत आहे.

2/7/25

४) Ministry of Commerce & Industry Department यांच्या दि. ०९.०४.२०२४ च्या Instruction No. ११५ मधील issue No. १६ नुसार SEZ Rule ११B अंतर्गत फक्त बांधकाम केलेल्या क्षेत्राकरीता (Non processing) IT & ITes उद्योगासाठी/व्यवसायासाठी अनुज्ञेय राहिल

५) ज्या भुखंडाचे क्षेत्र २०००० चौ.मी. पेक्षा कमी असेल तर अश्या Non processing area करणेकरिता भुखंडधारकाकडुन रक्कम रुपये १ कोटी शुल्क म्हणुन वसुल करणेत यावे.

६) ज्या भुखंडाचे क्षेत्र २०००० चौ.मी. पेक्षा जास्त असेल तर अश्या भुखंडाचे Non processing area करणेकरिता भुखंडधारकाकडुन रक्कम रुपये २ कोटी शुल्क म्हणुन वसुल करणेत यावे.

७) भुखंडधारकाकडुन एकदा बांधीव क्षेत्राकरिता Non processing Fee वसुल केल्यानंतर सदर भुखंडाकरिता पुनश्च Non processing Fee वसुल करणेत येऊ नये. परंतु सदर भुखंडापोटी महामंडळाशी निगडित इतर कामे (हस्तांतरण, मुदतवाढ, सबलिज इत्यादी ) देणी असल्यास ती महामंडळाच्या धोरणानुसार वसुल करणेत यावेत.

८) भुखंडाचा वापर हा IT/ ITES करिता अनुज्ञेय राहील

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी ,मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(Sd/- 21/3/25)

(डॉ. विजय राठोड)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (विदर्भ)
मऔविम, मुंबई -९३

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. महाव्यवस्थापक (भूमि)/विधी /भुसंपादन/मावतं/जनसंपर्क/म.ब.वि./डीएमआयसी/पणन )
४. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
५. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
६. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
७. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.
८. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
९. सर्व औद्योगिक संघटना.
१०. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई